# बिहार निवडणूक- काही लक्षणीय मुद्दे

**४ ऑक्टोबर २०११**

प्रज्ञा शिदोरे

GreenEarth Social Development Consulting Pvt. Ltd.
contactus.greenearth@gmail.com

(शासनव्यवस्थेच्या नीलप्रतीसाठी)

# बिहार निवडणूक- काही लक्षणीय मुद्दे

बिहारमधील विधानसभा निवडणूका २१ ऑक्टोबर २०१० ते २० नोव्हेंबर २०१० दरम्यान ६ फेऱ्यांमध्ये झाल्या. निवडणूकीचा निकाल २४ नोव्हेंबर रोजी लागला व नितीशकुमार यांच्या सत्ताधारी जनता दल (यूनायटेड) आणि भारतीय जनता पक्ष या आघाडीने सुमारे ८३.५ टक्के जागा मिळवत, चार पंचमांश बहुमत मिळवले.

ही निवडणूक अनेक अर्थाने ऐतिहासिक होती. तिचे विश्लेषण आम्ही करू, पण इकॉनॉमिक टाईम्स, मिंट व टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रांत आलेल्या काही लक्षणीय मुद्दे आपल्यापर्यंत लगेच पोचवावेसे वाटले. त्या मुद्द्यांचे हे संकलन खाली मांडत आहोत.

१. **जातीनिष्ठा, सांघिक संघर्ष व आकर्षक व्यक्तिमत्व या भावनिक मुद्द्यांपलिकडे राजकारण जाऊ पाहात आहे.**
२. **सुशासन व विकास हेच खरे विजयाचे निर्णायक घटक आहेत.**
३. **सर्वसमावेशक विकासासाठीचे प्रामाणिक प्रयत्न राजकीय फायदा देतात.**
४. **सत्तेत येण्यासाठी पूर्वी निवडणुकीचे तंत्र अवगत असणे पुरेसे होते. आता जो लोकाभिमुख कामचं निवडणूक जिंकून देते.**
५. **समाजाच्या सर्वात खालच्या स्तरामध्ये लोकशाहीचे पुनरुत्जीवन हा नितीश कुमार यांचा राजकीय वारसा ठरेल.**
६. **बिहारचा निकाल ही उत्तरेकडच्या बदलत्या राजकारणाची नांदी ठरेल व त्याचे पडसाद राष्ट्रीय राजकारणावर पडतील.**
७. **दलित वर्गाच्या कार्यक्षमतेविषयी साशंकता असल्याने कायमच दुर्लक्ष या पारंपारिक मताला नितीश कुमारांच्या शासनाने छेद दिला.**

## नितीश कुमार यांनी काय केले?

मागासलेले राज्य म्हणून कुप्रसिध्द बिहारला नितीश कुमार यांच्या नेतृत्वाने जातीय राजकारणाच्या बाहेर आणून, विकासातून सबलीकरणाचे स्वप्न साकार केले आहे. राजकीय विश्लेषकांना या निकालामध्ये भारतातील आर्थिक तेजीपासून वंचित अशा बिहारी जनतेच्या आकांक्षांच प्रतिबिंब दिसत. अशांपैकीच खूप मोठा वर्ग महिला व तरूणांचा आहे ज्यांना नितीश सरकारच्या 'मुख्यमंत्री बालिका सायकल योजना, कन्या सुरक्षा योजनांसारख्या योजनांचा फायदा झाला. हेच निवडणूकीमधे अभूतपूर्व संख्येने मतदानास उतरले.

या निवडणूकीमध्ये उच्चवर्णीयांबरोबरच अत्यंत मागासवर्गीय, महादलित, अधिकारहीन मुस्लिम, यादवेतर मागासवर्गीय इतर महत्त्वाच्या सामजिक गटांचा पाठिंबा मिळविण्यात यश मिळविले. सिमांचल सारख्या आपत्तीग्रस्त भागातही परिणामकारक कामामुळे मोठे यश मिळाले.

कायदा व सुव्यवस्थेसाठी नितीश सरकारने राजकीय हस्तक्षेप थांबवून शीघ्र न्यायालयांची स्थापना केली. त्यानेच गुन्हेगारी आटोक्यात आली.

दिल्लीमधील सेंटर फॉर पॉलिसी स्टडीजचे अध्यक्ष प्रताप भानू मेहता म्हणतात "हा भारतीय लोकशाहीसाठी प्रेरणादायी निकाल आहे. जर नितीश कुमार यांना पराभव पत्करावा लागला असता तर 'निवडणूकांमधे सुशासन व विकास-कामे यांनी फार फरक पडत नाही' असा फार चुकीचा संकेत दिला असता. म्हणूनच हा विजय भारतीय लोकशाहीसाठी पुढची पायरी आहे."

मॉर्गन स्टॅनलीच्या विश्लेषणानूसार भारतीय राजकारणात काही मोठी स्थित्यंतरे घडून येत आहेत व बिहारमधील निकाल हा याच बदलत्या परिस्थितीचे उदाहरण आहे. आज भारतात २० पैकी १५ राज्यांमधे असे पक्ष सत्तेत आहेत ज्यांनी विकास कामांची अंमलबजावणी केली आहे. जे राज्यकर्ते अर्थकारणात काही सकारात्मक बदल करण्याची क्षमता ठेवतात अशांच्याच हातात आजचा मतदार सत्तेच्या चाव्या देतो.

## योग्य शासनप्रणालीमुळे आर्थिक वृद्धीला प्रोत्साहन मिळाले.

नितीश कुमार म्हणतात "हा विजय जनतेचा व विकासाचा आहे हे निश्चित केले आहे." २००५ पासून त्यांच्या कारकिर्दिमधे नितीश कुमार यांनी पायाभूत सुविधांच्या निर्मितीकडे व त्याच बरोबर राहायला व काम करायला सुरक्षित वातावरण निर्माण करण्याकडे विशेष लक्ष पुरविले आहे. पूर्वीच्या ३.५% या दराच्या तुलनेत गेल्या ५ वर्षांत २००५-२०१० बिहारची अर्थव्यवस्था वार्षिक सरासरी ११.३५% या दराने वाढली आहे.

राज्याचे एकूण उत्पन्न वाढविण्यात वाढलेला कर महसूल, वाढलेल्या रोजगाराच्या संधी, सरकारचा पायाभूत सोयींवरचा खर्च, राजकीय स्थैर्य या सर्व बाबींचा वाटा आहे.

रस्ते बांधणीवर सरकारी खर्चात २००५-०६ पासून २००८-०९ पर्यंतच्या काळात रू. २६३.२२ कोटी पासून रू. २,४८९.१५ कोटी पर्यंत म्हणजे तब्बल १० पट वाढ झाली आहे.
लालूप्रसाद यादव - राबरीदेवी यांचे सरकार असताना, राज्याच्या अर्थसंकल्पावर कधीही चर्चा झाली नाही, राबरीदेवींच्या काळात तर मंत्रीमंडळाच्या बैठकाही दुर्मिळ झाल्या होत्या. पण नितीश कुमार हे कोणत्यही मुद्द्याचा सखोल व सर्वांगीण विचार करून निर्णय घेतात असे त्यांच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

## भारतीय जनता पक्षाचा बदलता रंग

या निवडणूकीने भारतीय जनता पक्षासाठी २ महत्वाचे धडे आहेत असे दिल्लीमधील सेंटर फॉर पॉलिसी स्टडीजचे अध्यक्ष प्रताप भानू मेहता म्हणतात.

1. कुठलेही राजकारण हे स्थानिकच असते. राजकारणात स्थानिक प्रश्नांवर कानाडोळा करून चालत नाही. शेवटी तुमची स्थानिक पक्षबांधणीच तुम्हाला यश देते. बिहारमधे भा.ज.पाने निवडणूकीचे अप्रतीम व्यवस्थापन केले.
2. प्रचार धडाकेबाज झाला नाही तरी चालेल, पण तो समाजघटकांमध्ये दुही निर्माण करणारा नक्कीच नसावा. या निर्णयामुळे असे दिसते की भा.ज.पची हा एक राष्ट्रीय प्रतिमा नसून प्रत्येक राज्यानुसार ती बदलते. यापुढे पक्षांना राष्ट्रीय प्रतिमेबरोबरचं स्थानिक प्रतिमेकडे बारीक लक्ष द्यावे लागेल. जिथे पक्ष कार्यकर्त्यांचे स्थानिक लोकांशी चांगले संबंध आहेत तिथे भा.ज.प. ने मुळे घट्ट केली आहेत.

भारतीय जनता पक्षाने आता “हिंदुत्त्वा”चा मुद्दा बाजूला ठेऊन “सर्वसमावेशक विकासा” ची कास धरायचे ठरवले आहे. ज्याची परिणती मुस्लिम मते मिळण्यात झाली आहे. भारतीय जनता पक्षाची इतर राज्यांत इतर पक्षांबरोबरची चिंताजनक युती पाहता, बिहारमधील युतीचे यश प्रेरणादायी आहे.

उत्तर प्रदेश व बिहार सारख्या जातीयवादाने पछाडलेल्या राज्यांतही सुशासन व विकासाचा प्रश्नच निवडणूकीमध्ये महत्त्वाचा ठरतो हेच या निवडणुकीने दाखवले आहे.

विकासाबरोबरच उमेदवारांची पक्षनिष्ठा व स्वच्छ चारित्र्य या गोष्टी निवडणूक जिंकण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या ठरतात हे या निकालाच्या निमित्ताने पुन्हा समोर आले.

## बिहार निवडणूकींमधील काही ठळक घडामोडी:

१. बिहारच्या इतिहासातील सर्वात मोठा विजय व भारतीय राजकारणाच्या इतिहासात एखाद्या संयुक्त आघाडीला मिळालेला सर्वात मोठा विजय.
२. बिहारच्या राजकीय इतिहासातील सर्वात शांतिपूर्ण निवडणूक.
३. भारतीय जनता पक्षाच्या १०२ उमेदवारांपैकी ९२ विजयी. म्हणजेच गेल्या निवडणूकीच्या तुलनेत दुप्पटीने विजय.
४. कॉंग्रेस पक्षाने निवडणूक जाहिरातींवर भारंभार खर्च करून, सोनिया व राहुल गांधी यांसारख्या प्रभावी नेत्यांच्या करिष्म्याला भुलून न जाता बिहारच्या जनतेने विकासावर शिक्कामोर्तब केले.
५. बिहारमधील निवडणूकीने जातीय समीकरणांना तिलांजली दिल्याचे दिसून आले.